नाही.

१२) तुमच्या जागेमध्ये आमचे कर्मचारी अणि सोसायटी, कंपनी, अथवा असोसिएशन यांचे कर्मचारी यांना जरुर ती पूर्व जाणिव देवून जागा पाहण्याचा, तपासणी करण्याचा अधिकार आहे. आणि अशा पाहणीमध्ये यदाकदाचित तुमच्या मार्फत काही गैरगोष्टी जागेमध्ये झाल्या आहेत, असे दिसून आले तर त्या गोष्टी दूर करण्याची जबाबदारी तुमची स्वतःची असून त्यासाठी होणारा खर्च तुमचे तुम्ही करण्याचा आहे.

वरील प्रमाणे शर्ती तुम्ही मान्य केल्या आहेत. त्या बद्दल तुमचे व आमचे दरम्यान वरील शर्ती ठरल्याबद्दल तुम्ही या खरेदीखतावर सही केली आहे, शिवाय वरील शर्ती तुम्ही स्वतः करीता व अन्य व्यक्तींच्या फायद्यासाठी कबूल केलेल्या आहेत.

१३. आम्ही तुम्हास जागेचा कबजा दिल्यानंतर आमचेवर कोणतीही जबाबदारी नाही. मात्र ताबा घेण्यापूर्वी बांधकामात काही दोष असल्यास ते दुरुस्त करुन देवू. ताबा तुम्ही घेतल्यानंतर कोणत्याही प्रकारची तक्रार आम्ही मान्य करणार नाही. तसेच जागेचे नुकसान तुमच्या गैरवापरामुळे झाले असल्यास अथवा त्यामुळे इतरांच्याजागेला नुकसान पोहचले असल्यास व त्यामुळे इमारतीचे काही नुकसान झाले असल्यास ते नुकसान दूर करुन देण्याची जबाबदारी आमच्यावर नाही. तसेच नियमीत वापरामुळे जागेचे जे काही नुकसान होवू शकेल / शकते (रिझनेबल वेअर एण्ड टेअर) ते दुरुस्त करुन देण्याची जबाबदारी आमच्यावर नाही.

१४. आम्ही जी संस्था, सोसायटी, असोसिएशन अथवा कंपनी स्थापन करु त्या संस्थेचे सभासद होण्याचे तुम्ही कबूल केलेले आहे. तसेच त्याप्रमाणे सभासद होण्याकरिता हरएक प्रकारच्या कागदावर, प्रतिज्ञापत्रावर दस्तऐवजावर सह्या करुन देण्याचे कबूल केले आहे आणि अशा प्रकारे तुम्ही लागणाऱ्या दस्तऐवजावर सह्या करुन देण्याचे नाकारल्यास प्रस्तुत खरेदीखत रद्द करण्याचा अधिकार आम्हांस आहे. व राहील. तसेच उपरोक्त संस्थेचे सभासद होतांना संस्था नोंदण्यासाठी व अन्य कारणासाठी जो काही खर्च येईल त्या खर्चामध्ये तुम्ही प्रमाणामध्ये हिस्सराशीने खर्च करण्याचा आहे व ते तुम्ही कबुल केले आहे. याप्रमाणे सोसायटी/असोसिएशन कंपनी / अपार्टमेंट यापैकी जी काही संस्था निर्माण होईल त्यावेळी ज्या काही जागा विकल्या गेल्या नसतील त्याचा हक्क, तसेच बांधकामासाठी जो एफ. एस. आय. शिल्लक राहीला असेल त्याचा हक्क, तसेच गच्ची व मोकळ्या जागांचा हक्क या खरेदीखतामध्ये लिहील्या प्रमाणे आमचाच राहील व तो हक्क त्याप्रमाणे राखून ठेवण्याचा आम्हांस अधिकार आहे व राहील. या प्रमाणे निर्माण होणाऱ्या संस्थेचे नियम, पोटनियम तुमच्यावर बंधनकारक राहतील.

१६. खालील प्रमाणे रक्कमा तुम्ही मागणी होताच ७ (सात) दिवसांच्या आत आमचेकडे आम्ही जेंव्हा मागू तेंव्हा जमा करावयाच्या आहेत. मुदतीत रक्कम न दिल्यास दंड म्हणुन रु.२ द.मा.द.शे द्यावी लागेल.

या शिवाय सामाईक लागणारा खर्च जो लागेल तो तसेच मिळकतीचे टॅक्सेस भरण्यासाठी जमा करावयाची अंदाजे रक्कम जी लागेल ती तुम्ही आम्हांस देण्याची आहे. याशिवाय आणखी ज्या रक्कमा भराव्या लागतील व कामे करावी लागतील त्या त्या रक्कमा तुम्ही भरुन देण्याचे कबूल करीत आहात. तसेच उपरोक्त रक्कमा कमी पडल्यास त्या रक्कमंशिवाय आणखी काही रक्कमा द्याव्या लागल्यास त्या रक्कमा देण्याची जबाबदारी